महासागर
मंगळवार, दि. 16 सितम्बर 2025
अमरावती
पान 3

# तीन लाखांच्या चरससह नागपूरचा तस्कर अटकेत

## एक फरार, 3 लाखांचा मुद्देमाल जप्त | नागपुरीगेट पोलिसांची कारवाई





महासागर | प्रतिनिधी

**अमरावती, (दि.15) :** नागपूरहून शाळेच्या बॅगेत चरस घेऊन अमरावतीत विक्रीसाठी आलेल्या एका आरोपीला नागपुरीगेट पोलिसांनी पठाण चौक परिसरातून अटक केली. तर एक आरोपी पसार झाला. प्रतीक प्रभाकर पुनटकर (24, रा. गोंडखोरी, नागपूर) असे अटक आरोपीचे नाव असून, फरार आरोपी यामिन खान युसुफ खान (रा. गोंडाळी, नागपूर) याचा शोध पोलिस घेत आहे.

नागपुरी गेटचे पोलिस राजेंद्र पिंपळे हे आपल्या सहकाऱ्यांसह पेट्रोलिंग करत असताना त्यांना माहिती मिळाली की पठाण चौकात दोन युवक काळ्या शाळेच्या बॅगेत अमंली पदार्थ घेऊन विक्रीसाठी थांबले आहेत. त्यानंतर वरिष्ठ पोलिस निरीक्षक हनुमंत उरलागोंडावर व पीआय साळुंके यांना माहिती देऊन पोलिस पथकाने तत्काळ घटनास्थळी छापा टाकला. पोलिस पाहताच आरोपी यामिन खान पळून गेला. मात्र प्रतीक पुनटकर पोलिसांच्या हाती लागला. पोलिसांनी त्याच्या बॅगची तपासणी असता त्यामध्ये अमंली पदार्थ आढळून आली. त्यामुळे पोलिसांनी फॉरेन्सिक तज्ज्ञांना बोलावून तपासणी केली. त्यावेळी तो पदार्थ चरस असल्याचे निष्पन्न झाले. त्यामुळे पोलिसांनी आरोपी प्रतिकच्या ताब्यातून एकूण 980 ग्रॅम चरस (किंमत सुमारे 2 लाख 85 हजार) आणि मोबाईल मिळून एकूण 3 लाख 500 रुपयांचा मुद्देमाल जप्त केला. या प्रकरणी सहाय्यक पोलिस निरीक्षक वैशाली चव्हाण यांच्या तक्रारीवरून आरोपी प्रतीक पुनटकर व फरार आरोपी यामिन खानविरुद्ध एनडीपीएस कायद्यानुसार गुन्हा दाखल करण्यात आला आहे. ही कारवाई पोलिस आयुक्त अरविंद चावरिया, उपायुक्त गणेश शिंदे, सहाय्यक पोलिस आयुक्त शिवाजी बचाटे यांच्या मार्गदर्शनाखाली वरिष्ठ पीआय हनुमंत उरलागोंडावर, डीबी प्रमुख गजानन विधाते, एपीआय वैशाली चव्हाण, राजेंद्र पिंपळे, शफी, कुणाल, शेखर, दानिश शेख, राहुल रोडे व सागर पंडित यांच्या पथकाने केली.



### खरेदीदार कोण ?

आरोपी प्रतीक पुनटकर व यामिन खान हे नागपूरहून अमरावतीत चरस विक्रीसाठी आले होते. मात्र या शहरात त्यांचा खरेदीदार कोण होता, हे अद्याप स्पष्ट झालेले नाही. चौकशीत प्रतीक पुनटकरने सांगितले की खरेदीदाराविषयी माहिती त्याला नाही, ती केवळ फरार आरोपी यामिन खानलाच आहे. त्यामुळे पोलिसांचे पथक आता यामिन खानच्या शोधासाठी नागपूर गाठणार असल्याची माहिती मिळाली आहे.

# कुत्र्याला बेदम मारहाणीनंतर वाद पेटला

- बडनेरात तणाव; दोन गट आमनेसामने
- रात्रभर राहिला कडेकोट पोलीस बंदोबस्त

महासागर | प्रतिनिधी



**अमरावती, (दि. 15) :** हॉटेलबाहेर भटक्या कुत्र्याने लघुशंका केल्यानंर हॉटेल मालकाने त्या कुत्र्याला बेदम मारहाण केली. या मारहाणीच्या प्रकारावर एका व्यक्तीने आक्षेप घेतल्याने बडनेरा येथे रविवारी रात्री चांगलाच वाद पेटला. या वादातून दोन गट समोरासमोर आले. परंतू पोलीसांनी वेळीच हस्तक्षेप केल्याने परिस्थिती नियंत्रणात आणता आली.या प्रकारानंतर संपूर्ण रात्रभर शहरात कडक पोलीस बंदोबस्त ठेवण्यात आला होता.

घटनेविषयी सविस्तर माहिती अशी की, बडनेरा पोलीस ठाण्याच्या हद्दीत सायंकाळी सुमारे 9 वाजता एका हॉटेलबाहेर रस्त्यावर भटक्या कुत्र्याने मूत्रविसर्जन केले. हे पाहून हॉटेल चालकाने कुत्र्याला काठीने मारले. तेवढ्यात तेथून जात असलेल्या मद्यप्राशन केलेल्या एका व्यक्तीच्या भावना दाटून आल्या व त्याने कुत्र्याला मारल्याबद्दल जाब विचारुन हॉटेल चालकाशी वाद घालण्यास सुरुवात केली. या वादाचे रूपांतर हाणामारीपर्यंत पोहोचण्याची चिन्हे निर्माण झाली. या प्रकाराची माहिती इतरत्र पोहोचताच अल्पावधीतच दोन्ही बाजूंचे परिचित व समर्थक घटनास्थळी जमा झाले. पाहता पाहता दोन्ही गट एकमेकांसमोर उभे ठाकताच परिसरातील वातावरण तापले.

याची माहिती मिळताच पोलीस उपायुक्त गणेश शिंदे तसेच बडनेरा पोलीस ठाण्याचे अधिकारी व मोठा पोलीस बंदोबस्त घटनास्थळी दाखल झाला. पोलिसांनी परिस्थिती नियंत्रणात घेत जमावाला पांगवले. दोन्ही गटांतील प्रत्येकी दोन जणांविरुद्ध गुन्हे नोंदविले. रात्रभर बडनेर्यात पोलीस तैनात राहून कायदा व सुव्यवस्था अबाधित ठेवण्यात आली. सकाळपर्यंत परिस्थिती पूर्णपणे शांत झाली आहे.

# अनधिकृतपणे टाकलेले केबल तत्काळ काढा!

## महानगरपालिकेचा इशारा

महासागर | प्रतिनिधी

**अमरावती, (दि. 15)** शहरातील रस्त्यांच्या कडेला मोठ्या प्रमाणावर अनधिकृतरीत्या ऑपटिकल फायबर केबल टाकण्यात आले असून, त्यामुळे सार्वजनिक सुरक्षेचा गंभीर प्रश्न निर्माण झाला आहे. यासंदर्भात अमरावती महानगरपालिकेने कठोर भूमिका घेतली असून अशा सर्व अनधिकृत केबल्स तात्काळ काढून टाकण्याचे आदेश देण्यात आले आहेत.

महानगरपालिकेच्या वतीने जाहीर करण्यात आलेल्या पत्रकात स्पष्ट करण्यात आले आहे की, रस्त्यांच्या कडेला आणि पदपथांवर अनधिकृतरीत्या टाकलेले केबल्स वाहतूक व पादचाऱ्यांच्या सुरक्षेसाठी धोकादायक ठरत आहेत. तसेच या कारणामुळे शहराच्या सौंदर्यावरही परिणाम होत आहे. महानगरपालिकेने सर्व संबंधित कंपन्या, खाजगी संस्था व दूरसंचार सेवा पुरवठादार यांना सात



दिवसांच्या आत स्वत:हून हे केबल्स काढून टाकण्याचे निर्देश दिले आहेत. जर सूचनेचे पालन केले नाही, तर सात दिवसांनंतर महानगरपालिका स्वत: केबल्स काढून टाकेल व त्याचा संपूर्ण खर्च तसेच इतर दंड संबंधित व्यक्तींकडून वसूल केला जाईल, असा इशारा देण्यात आला आहे. महानगरपालिका प्रशासनाने ही कारवाई सार्वजनिक सुरक्षेला प्राधान्य देऊन हाती घेतली आहे. नागरिकांच्या सुरक्षिततेसाठी व सार्वजनिक पायाभूत सुविधांचा योग्य वापर सुनिश्चित करण्यासाठी ही मोहीम राबविण्यात येणार असल्याचे स्पष्ट करण्यात आले आहे.

### कत्तलीसाठी जाणाऱ्या 40 गायींना जीवदान

**धामणगाव रेल्वे :** महामार्ग पोलिस केंद्र धामणगाव (देवगाव) आणि तळेगाव दशासर पोलिसांनी गुप्त माहितीच्या आधारे कत्तलीसाठी नेण्यात येत असलेल्या इसार वाहनावर कारवाई केली. पोलिसांनी इसार वाहन क्रमांक एमएच 40/सीटी 4812 देवगाव चौफुली येथे थांबवून तपासणी केली. वाहनामध्ये गायी आणि बैल भरलेले आढळले, त्यातील 40 गायी जिवंत आणि चार गायी मृत अवस्थेत सापडल्या. या यशस्वी कारवाईचे नेतृत्व पोलिस उपनिरीक्षक जमनादास सोनटक्के यांनी केले. लाल रंगाचे इसार वाहन गुप्त माहितीच्या आधारे लक्षात आले होते की, त्यात गायींची अवैध तस्करी केली जात आहे. त्यामुळे पोलिसांनी टोल नाक्यावरून वाहनाचे हालचाल लक्षात ठेवून, योग्य ठिकाणी नाकाबंदी करून वाहन थांबवले. वाहन चालक बलकरण बाजू नागवंशी, सुकरलाल जोगी खारे आणि सोनू शिवनाथ मेहलवंशी यांना ताब्यात घेतले गेले. तपासणी करताना गायी लाकडी फळ्यांनी दोन भागात विभागलेली आढळली, त्यामुळे त्यांची सुरक्षितता धोक्यात होती. पोलिसांनी वेळेवर हस्तक्षेप करत सर्व 40 जिवंत गायी वाचवल्या.

# गायवाडी येथे घरावर विज कोसळली

## लाखों रुपयांचे विद्यूत उपकरणं निकामी

महासागर | प्रतिनिधी

**दर्यापूर, (दि. 15) :** नजिकच्या गायवाडी गावात शनिवारी सायंकाळी मुसळधार पावसासोबत विजांच्या कडकडाटाने थैमान घातले. यावेळी गावातील अशोक साखरे यांच्या घरावर विज कोसळल्याची घटना घडली. साडेसात वाजताच्या सुमारास अचानक विज कोसळल्याने घराची संरक्षण भींत तुटली. सुदैवाने कोणतीही जिवितहानी झाली नाही, मात्र घरातील विद्युत उपकरणे टीव्ही, फ्रीज, पंखे, इन्व्हर्टर आणि पाण्याच्या मोटारी यांसह अनेक उपकरणे जळून नुकसान झाले.

तलाठी वैशाली भुयार, कोतवाल चक्रधर बेलसरे व ग्रामपंचायत पदाधिकाऱ्यांनी घटनास्थळी जाऊन पंचनामा केला. प्राथमिक तपासणीत अंदाजे 20 ते 25 घरातील उपकरणे जळून निकामी झाली असून, सुमारे 15 ते 20 लाख रूपयांचे नुकसान झाल्याचे आढळले. ग्रामस्थांनी तातडीने



आर्थिक मदतीची मागणी केली आहे. त्यांनी प्रशासनावर दबाव टाकून नुकसान भरपाईची प्रक्रिया सुरू करण्याचे आवाहन केले आहे. घटनेमुळे परिसरात चिंता वाढली असून प्रशासनाने त्वरीत मदतीचे पाऊल उचलावे, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

# अचलपूर विभाग अवैध धंद्यांचे माहेरघर

महासागर | बादल डकरे

**चांदूर बाजार, (दि. 15) :** अचलपूर विभाग (डिव्हिजन) सध्या अवैध धंद्यांचे माहेरघर बनत चालले आहे. गुटखा, गोवंश वाहतूक, मुरूम, देशी-विदेशी दारू व गांजाची तस्करी मोठ्या प्रमाणावर सुरू असल्याचा प्रकार निदर्शनास येत आहे. नागरिकांना विभागातील पोलीस स्टेशनकडून अपेक्षा नसताना स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाकडूनही काही अपेक्षा उरलेल्या नाहीत. नागरिकांच्या म्हणण्यानूसार हे पथकही नावालाच असून अवैध धंद्यांविरुध्द कुठलीच कारवाई होत नसल्याचा आरोप केला जात आहे.

अचलपूर, चांदूर बाजार, आसेगाव या भागात अनेक ठिकाणी खुलेआम मटका, चोरी, जुगार अड्डे तसेच देशी-विदेशी दारू विक्री सुरू आहे. याशिवाय, अवैध वाळू वाहतूक आणि गोवंश तस्करीही मोठ्या प्रमाणावर वाढल्याची माहिती मिळाली आहे. विशेषत: गेल्या काही




### स्थानिक गुन्हे शाखेचे पथक नावालाच

महिन्यांत गांजाची तस्करीही प्रचंड प्रमाणात सुरू असल्याचे स्थानिकांनी सांगितले. स्थानीय नागरिकांचे म्हणणे आहे की, पेट्रोलींग पथक केवळ पेट्रोलिंगच्या नावाखाली गाड्या फिरवत असून प्रत्यक्ष गुन्हेगारी नियंत्रणासाठी कार्य करत नाही. यामुळे गुन्हेगारांना मोकळा रान मिळाले असून, स्थानिक गुन्हे शाखेच्या कार्यक्षमतेवर प्रश्नचिन्ह उभे राहिले आहे. त्यांनी अनेक वेळा मनपा प्रशासनाकडे निवेदन दिले तरीही प्रतिसाद मिळालेला नाही.

या निष्क्रियतेच्या पार्श्वभूमीवर स्थानिक पातळीवरून पथक प्रमुखांची बदली करून त्यांच्या जागी नवा, सक्रिय व गुन्हेगारीविरोधात कठोर भूमिका घेणारा अधिकारी नियुक्त करण्यात यावा, अशी मागणी जोर धरत आहे. प्रशासन या मागणीची दखल घेणार का ?, हे पाहणे महत्त्वाचे ठरणार आहे.

जिल्ह्यात गुन्हेगारी नियंत्रणासाठी स्थानिक गुन्हे शाखेची भूमिका अत्यंत महत्त्वाची असते. मात्र सध्याची स्थिती पाहता अचलपूर डिव्हिजनमध्ये LCB पथकाच्या निष्क्रियतेमुळे गुन्हेगारांना मोकळे रान मिळाले आहे.यावर तातडीने कारवाई न झाल्यास परिस्थिती आणखी गंभीर होण्याची शक्यता आहे.यावर स्थानिक गुन्हे शाखेच्या पोलीस निरीक्षक किरण वानखडे काय पाऊल उचलणार हे पाहणे वावगे ठरणार आहे


# ग्रामपंचायत कार्यालय सुकळी

## अंजनगांव सुर्जी दर्यापूर जि.प. अमरावती

ग्रामपंचायत कार्यालय सुकळी येथे खालील कामाकरीता जि.प. बांधकाम विभागाकडील उचित वर्गावारीत नोंदणीकृत कंत्राटदार यांचे कडून बी-१ नमुन्यातील निविदा मागविण्यात येत आहेत, तसेच निविदा स्विकारण्याचा अथवा नाकारण्याचा अधिकार ग्रामपंचायत कार्यालय सुकळी राखून ठेवत आहेत.

| कामाचे नाव | योनजचे नाव | अंदाजपत्रकीय रक्कम | निविदा फी | बयाना रक्कम | काम पूर्ण करण्याचा कालवधी |
|---|---|---|---|---|---|
| कॉंक्रिट रस्ता बांधकाम करणे | अ.जा.व.न.बौ. घ.व. विकास | ४००००० | ५०० | ४००० | ६ महिने |

**निविदा कालावधी :**

निविदा प्रसिद्धीची दिनांक व वेळ - १६/०९/२०२५ वेळ सकाळी ११.०० वाजता

निविदा सादर करण्याची अंतिम तारीख- २२/०९/२०२५ वेळ सायंकाळी ५.०० वाजेपर्यंत

निविदा उघडण्याची दिनांक व वेळ - २३/०९/२०२५ वेळ सकाळी ११.०० वाजता (शक्य झाल्यास)

**टिप :-** १) सदर निविदा प्रक्रियेमध्ये फेरबदल किंवा रद्द करण्याचे सर्वस्वी अधिकार ग्रामपंचायत सुकळी कार्यालय यांचे कडे राखीव ठेवण्यात आले आहेत.

**सरपंच** ग्रा.प. सुकळी | **उपसरपंच** ग्रा.पं. सुकळी | **सचिव** ग्रा.प. सुकळी


# वा... सिताफळ मोठे मजेदार!

## देऊरवाडा, काजळी येथील सीताफळास जिल्ह्याबाहेरही मागणी

महासागर | प्रतिनिधी

**चांदुर बाजार, (दि.15) :** गावरान चव, आरोग्यदायी गुणधर्म आणि कमी खर्चात जास्त उत्पादन असे मजेदार असलेले सिताफळ विदर्भातील अनेक गावांमध्ये आर्थिक उत्पन्नाचे स्त्रोत बनले आहे. चांदुर बाजार तालुक्यातील देऊरवाडा, काजळी, ब्राम्हणवाडा थडी, कोदोरी, निंभोरा या गावांमध्ये यंदा सीताफळांचे समाधानकारक उत्पादन झाले असून या फळांना जिल्ह्याबाहेरही मोठी मागणी निर्माण झाली आहे. परिणामी विक्री वाढली असून एका कॅरेटसाठी 1500 ते 1700 रुपये इतका दर मिळत आहे.

सामान्यत: विजयादशमीच्या सुमारास सीताफळांची बाजारात आवक सुरू होते. मात्र यंदा गणेशोत्सवाच्या आधीपासूनच बाजारपेठेत सीताफळांची विक्री सुरू झाली आहे. चांदुर बाजारमधील जयस्तंभ चौक आणि इतर ठिकाणी अनेक ठेलेवाले सीताफळांची विक्री करताना दिसत आहेत. विक्रेत्यांच्या मते, यावर्षी समाधानकारक पाऊस झाल्यामुळे



### उत्पादनात वाढ; प्रति कॅरेट दर 1500 रुपये पर्यंत दर

फळांचा दर्जा उत्तम असून त्यामुळे ग्राहकांची मागणीही मोठ्या प्रमाणात वाढली आहे.

सीताफळाचे वैशिष्ट्य म्हणजे ते कमी खर्चात भरघोस उत्पादन देणारे फळ आहे. कीड नियंत्रण, औषध फवारणी आणि खतांचा खर्च तुलनेत कमी असल्यामुळे शेतकऱ्यांना त्याचा अधिक लाभ होतो. त्यामुळेच अनेक शेतकरी पारंपरिक पिकांऐवजी सीताफळ लागवडीकडे वळताना दिसत आहेत. याचा परिणाम म्हणून ग्रामीण भागात हंगामी रोजगाराचाही प्रश्न सुटत आहे.

सीताफळाचा हंगाम हा तीन टप्प्यांत विभागला जातो ङ्क जून ते ऑक्टोबर, नोव्हेंबर ते डिसेंबर आणि जानेवारी ते फेब्रुवारी. सध्या पहिल्या बहरातील फळे बाजारात आली असून त्याला चांगला प्रतिसाद मिळत आहे. एका कॅरेटमध्ये सुमारे 80 ते 90 फळे येतात आणि त्याला 1500 ते 1700 रुपये दर मिळत आहे. त्यामुळे शेतकऱ्यांचे उत्पन्न वाढले असून त्यांना आर्थिक दिलासा मिळाला आहे.

### दर स्थिर राहणार

चव, आरोग्यदायी मूल्ये आणि स्थानिक बाजारपेठेसोबतच जिल्ह्याबाहेरील व्यापाऱ्यांकडूनही मागणी वाढल्यामुळे देऊरवाडा, काजळी परिसरातील शेतकऱ्यांचे उत्साह दुणावले आहेत. स्थानिक विक्रेत्यांसह शेतकऱ्यांना मिळणारा भाव हा त्यांच्या मेहनतीला लाभलेले फळ आहे. सीताफळाचे उत्पादन व विक्री यामध्ये सध्या प्रचंड उत्साह दिसून येत असून आगामी काळातही याचे दर स्थिर राहतील, असा अंदाज व्यक्त केला जात आहे.

आरोग्याच्या दृष्टीनेही सीताफळ अत्यंत गुणकारी फळ आहे. यामध्ये भरपूर प्रमाणात कॅल्शियम, प्रोटीन, फायबर आणि जीवनसत्त्वे असतात. हे फळ पित्तशामक, रक्तवर्धक, बलवर्धक असून हृदयासाठी फायदेशीर आहे. हृदयरोग, मधुमेह, ॲमसिडिटी यासारख्या आजारांमध्ये त्याचा उपयोग होतो. इतकेच नव्हे तर सीताफळाच्या बिया केसांसाठी औषध तयार करण्यात वापरल्या जातात.

आरएनआय ४६९७५/१९८५ महासागर अमरावती

मालक, मुद्रक, प्रकाशक श्रीकृष्ण तनसुखदास चांडक यांनी अरूणोदय प्रेस, कॉटन मार्केट, नागपूर १८ येथे छापून दैनिक महासागर कार्यालय, होटल टूरिस्टच्या बाजूला रेल्वे स्टेशन चौक, अमरावती येथे प्रकाशित केले. संपादक -श्रीकृष्ण तनसुखदास चांडक (पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांच्यावर राहील) अमरावती मुख्य कार्यालय, पत्ता. दैनिक महासागर, होटल टूरिस्टच्या बाजूला रेल्वे स्टेशन चौक अमरावती, फोन नं. ९५१८९३४५०४

# तालुक्यात सोयाबीन पिकाचे पन्नास टक्क्याहून अधिक नुकसान

## विविध रोगांचा प्रादुर्भाव वाढला कृषी विभागाचे निरीक्षण

महासागर | प्रतिनिधी

**चांदूर रेल्वे,( दि.15 ) :** तालुक्यातील विविध गावांमध्ये सोयाबीन पिकांवर रोगांचा वाढता प्रकोप पाहता कृषी विभागाकडून सखोल पाहणी करण्यात आली. त्यात पिकांवर रायझोक्टोनिया एरियल ब्लाईट, करपा रोग व पिवळ मोजॅक विषाणूचा प्रादुर्भाव मोठ्या प्रमाणात आढळला. यामुळे तालुक्यातील सोयाबीन पिकाचे सुमारे पन्नास ते साठ टक्के नुकसान झाल्याचा निष्कर्ष प्राप्त झाला आहे.



तालुका कृषी अधिकारी संचित ढाकरे, कृषी विज्ञान केंद्र घाटंजीचे प्रा. डॉ. संजय पायखांडे यांच्यासह कृषी विभागातील कर्मचारी यांचे पथक शेतकऱ्यांच्या शेतात जाऊन सखोल स्थितीची पाहणी केली. मागील महिन्यात अचानक पावसाचा खंड पडल्यामुळे तसेच सतत ढगाळ वातावरण राहिल्याने हवामानात जास्त आर्द्रता निर्माण झाली होती. या परिस्थितीमुळे रोगराईला पोषक वातावरण तयार झाले. विशेष म्हणजे, रोगनियंत्रणासाठी आवश्यक फवारणीसाठी हवामान उपलब्ध नसल्यामुळे शेतकरी वेळीच उपाय करू शकले नाहीत. परिणामी, रोग झपाट्याने पसरत आहेत.

### अशी आहेत रोगांचे लक्षणे

पिकांची अवस्था 85 ते 90 दिवसांच्या अवस्थेत असून अनेक शेतकऱ्यांनी पिकांची वाढ खुंटल्याचे सांगितले. झाडांची वरची पाने पिवळसर होणे, पिवळ मोजॅक विषाणूचा प्रादुर्भाव तसेच रायझोक्टोनिया एरियल ब्लाईट व करपा रोगाचे स्पष्ट लक्षणे आढळली. शेतकऱ्यांनी ओंकार, खंडेश्वरी, पीकेव्ही आनंद, मॅक्स 1460 या वाणांची पेरणी केली होती.

### त्वरित उपाययोजनांची गरज

कृषी विभागाचे अधिकारी म्हणतात की, सध्याच्या परिस्थितीत जर शेतकऱ्यांनी लवकरात लवकर शिफारशीनुसार फवारणी केली नाही, तर उत्पादनात 30 ते 40 टक्क्यांपर्यंत घट होण्याची शक्यता आहे. त्यामुळे शेतकऱ्यांनी फवारणीसाठी मदत घेणे, योग्य औषधे वापरणे आणि शासनाच्या योजना अवलंबणे आवश्यक आहे. कृषी विभागाने पिकरक्षणासाठी विविध योजना व तंत्रज्ञान शेतकऱ्यांना उपलब्ध करून दिले आहे. शेतकऱ्यांना औषधांची माहिती, फवारणी पद्धती, आणि पर्यावरणपूरक उपाय याबाबत सल्ला देण्यात येत आहे. यामुळे त्यांनी त्यांच्या पिकांचे संरक्षण करण्यासाठी योग्य ती पावले उचलावी, असा आग्रह कृषी तज्ज्ञांनी व्यक्त केला आहे.

# महसूलचे काही भरारी पथक वांद्यात

## आर्थिक व्यवहारानंतर रेतीचे डंपर सोडले ?

महासागर | प्रतिनिधी

**वरुड, ( दि. 15 ) : वरुड तालुक्यातील महसूल प्रशासनाचे भरारी पथक वांद्यात सापडले असून, या पथकावर गंभीर आरोप होत आहेत, तहसील प्रशासनाचे काही भरारी पथक रेती तस्करांकडून पैसे स्वीकारून, रेतीचे डंपर वरुड तालुक्यातून मलकापूर, तिवसाघाट, भेंमडी, गव्हाणकुंड मार्गे पास करून देत असल्याची खमंग चर्चा सध्या तालुक्यात चांगलीच रंगली आहे.**



मुळात शासनाने बेकायदेशीर रेती तस्करी रोखण्यासाठी भरारी पथकाची नेमणूक केली असली, तरी या पथकातील काही अधिकाऱ्यांच्या संशयास्पद वर्तनामुळे प्रशासनावर प्रश्नचिन्ह उभे राहिले आहे. भरारी पथक रस्त्यावरील जवळपास 30 गाड्या पैसे घेऊन सोडल्याची तालुक्यात कुजबुज सुरु आहे. वर्धा नदीच्या काठावरून मलकापूर, तिवसाघाट, गव्हाणकुंड मार्गाने रेतीचे डंपर पहाटेच्या वेळी सर्रास धावताना दिसतात. अशा वेळी भरारी पथकाची नजर चुकवूनच डंपर चालतात की, पथकच मूकसंमती देतंय, असा प्रश्न उपस्थित केला जात आहे. या प्रकारामूळे सर्वसामान्य जनतेत प्रशासनाबद्दल अविश्वास निर्माण झाला आहे. रेती तस्करीमुळे शासनाला महसुलाचे मोठे नुकसान होत असून, दुसरीकडे नदीपात्राचा पर्यावरणीय समतोलही बिघडत आहे. तरीदेखील पथकानेच पैशांच्या बदल्यात तस्करीला प्रोत्साहन दिल्यास कायद्याचा धाक कुठे राहणार, असा सवाल नागरिकांनी केला आहे, अशा गैरप्रकारात सहभागी अधिकाऱ्यांची चौकशी करून कडक कारवाई करावी, अन्यथा रेती तस्करी थांबविण्याऐवजी ती अधिकच बळावेल अशी चर्चा आता जोर धरू लागली आहे.

# योगासन स्पर्धेत ममता वरखडे जिल्ह्यातून प्रथम

महासागर | प्रतिनिधी



**मोर्शी, ( दि. 15 ) –** तालुक्यातील ग्रामविकास विद्यालय व कनिष्ठ महाविद्यालय अंबाडा येथील विद्यार्थिनी कुमारी ममता वरखडे हिने 2025– 26 या वर्षात जिल्हा क्रीडा स्पर्धा अंतर्गत योगासन स्पर्धेत जिल्ह्यातून प्रथम क्रमांक पटकावला आहे. त्याबद्दल तिचे शाळेच्या शिक्षक वृंदातर्फे व गावकऱ्यांतर्फे अभिनंदन केल्या जात आहे. जिल्हा क्रीडा अधिकारी अमरावती तसेच महाराष्ट्र शासन यांच्या संयुक्त विद्यमाने यावर्षी घेण्यात आलेल्या जिल्हास्तरीय शालेय क्रीडा स्पर्धा अंतर्गत योगासन स्पर्धेमध्ये ग्राम विकास विद्यालय व कनिष्ठ महाविद्यालय अंबाडा येथील विद्यार्थिनी ममता वरखडे हिने जिल्ह्यातून प्रथम क्रमांक पटकावला आहे. त्याबद्दल तिचे सार्वत्रिक कौतुक होत असून विद्यालयातील सर्व शिक्षक शिक्षिका व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी अभिनंदन केले. तसेच प्रशिक्षक बिजवे यांची सुद्धा गावातून कौतुक केले. याबद्दल विद्यालयाचे मुख्याध्यापक अविनाश साळकर तसेच पर्यवेक्षक अविनाश फुटाणे यांनी सुद्धा कौतुक केले. ममता हिचे अंबाडा गावात सर्वत्र कौतुक होतं असून तिचे गावकऱ्यांनी अभिनंदन केले आहे.

# शकील डॉन टोळीतील कुख्यात सदस्याच्या मुसक्या आवळल्या

## अंजनगाव पोलिसांची बुलढाण्यातील गुन्हेगारावर कारवाई

महासागर | प्रतिनिधी

**अंजनगाव सुर्जी,( दि.15 ) –** अंजनगाव पोलिसांनी बुलढाणा भागातील कुख्यात घरफोडी करणाऱ्या शकील डॉन टोळीच्या मुख्य सदस्याला अटक केली आहे. मागील दोन महिन्यांपासून बुलढाण्यातील टोळी अंजनगाव तालुक्यात घरफोडी करत सक्रिय होती. बंद घरांमधून रोख रक्कम आणि सोन्याचे दागिने चोरी करण्याच्या अनेक घटनांमुळे नागरिकांना भितीचे वातावरण निर्माण झाले होते.

गुप्त माहितीनुसार अंजनगाव पोलीस व बुलढाणा येथील गुन्हे शाखेच्या संयुक्त पथकाने बुलढाण्यात कारवाई करून टोळीचा प्रमुख घरफोडी करणारा सदस्य शेख अहमद शेख समद (वय 36 वर्षे) याला अटक करण्यात यश मिळवले. सध्या टोळीचा मुख्य सूत्रधार शकील डॉन फरार असून त्याचा शोध सुरू आहे. न्यायालयाने आरोपीला 16 सप्टेंबरपर्यंतची पोलीस कोठडी सुनावली. 9 सप्टेंबर रोजी अंजनगाव शहरातील आशा नगर स्वप्ननगरी परिसरातील दोन बंद घरातून मोठ्या प्रमाणात रोख रक्कम आणि सोन्याचे दागिने चोरीला गेले. त्यानंतर पीडित महिलेकडून अज्ञात चोरट्यांविरुद्ध कलम 305, 331(1) बीएनएस अंतर्गत गुन्हा नोंदवण्यात आला. अंजनगाव पोलीस आणि जिल्हा ग्रामीण गुन्हे शाखेने त्वरित तपास सुरू केला. या आरोपीमार्फत जिल्हाभरात करण्यात आलेल्या इतर अनेक चोरीच्या घटना उघडकीस येण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. अंजनगाव पोलीस अधीक्षक विशाल आनंद, उपविभागीय पोलिस अधिकारी मनीष ठाकरे, पोलिस अधिकारी सूरज बोंडे आणि उपपोलीस अधिकारी सूरज तेलगोटे यांच्या मार्गदर्शनाखाली उपनिरीक्षक भरत चिर्डे हे या प्रकरणी तपास करत आहेत.

# डॉ. भीमराव पांचाळे यांचा कस्तुरबा गांधी संस्थानात सन्मान

## जुने नाते पुन्हा उजळले

महासागर | प्रतिनिधी

**चांदूर बाजार, ( दि. 15 ) :** सुप्रसिद्ध गझलकार आणि साहित्यिक डॉ. भीमराव पांचाळे यांचा कस्तुरबा गांधी संस्थान, माधाण येथे नुकतेच सन्मान करण्यात आला. डॉ. भीमराव पांचाळे यांना महाराष्ट्र शासनाने संगीत क्षेत्रातील सर्वोच्च मानले जाणारे लता मंगेशकर पुरस्कार 2025 प्रदान केले आहे. त्यांच्या गझलचे उत्कृष्ट प्रदर्शन आणि मराठी भाषेत केलेल्या रुपांतरासाठी त्यांना गझल नवाज या नावाने ओळखले जाते.



संस्थेच्या वतीने आयोजित या सन्मान सोहळ्यात डॉ. पांचाळे आणि त्यांच्या पत्नी यांचा सन्मान करण्यात आला. डॉ. भीमराव पांचाळे यांनी संस्थेच्या सहकार्याने त्यांचे जुने नाते उजळल्याचे सांगितले. त्यांनी उपस्थितांशी संवाद साधताना सांगितले की, कस्तुरबा संस्थान हे माझ्यासाठी केवळ शैक्षणिक संस्था नाही, तर भावनिक बंधाचे प्रतीक आहे. आज पुन्हा येथे येऊन सन्मानित होणे अत्यंत आनंदाचे आहे.

कार्यक्रमात डॉ. सुनील देशमुख, कोल्हे गुरुजी, निलेश फुटाणे, कुणाल पटवर्धन आणि पत्रकार पंकज आवारे यांची विशेष उपस्थिती होती. त्यांनी डॉ. भीमराव पांचाळे यांच्या साहित्यिक योगदानाचे गौरव केले आणि त्यांच्या कलेचे महत्त्व सांगितले. कार्यक्रमाचे आयोजन अत्यंत स्नेहपूर्ण वातावरणात पार पडले.

डॉ. भीमराव पांचाळे यांनी शिक्षण, समाजसेवा आणि कला क्षेत्रातील संस्थेच्या कार्यप्रणालीचे कौतुक करत शैक्षणिक व सांस्कृतिक वाटचालीसाठी विद्यार्थ्यांना प्रेरित करण्याचा संदेश दिला. त्यांनी विद्यार्थ्यांशी थेट संवाद साधण्याची इच्छा व्यक्त केली आणि पुढील वेळी भेटीची आश्वासनही दिले. संस्थेने सांगितले की, अशा प्रेरणादायी व्यक्तिमत्त्वांचा सन्मान विद्यार्थ्यांसाठी एक मोठा आदर्श आहे. यामुळे विद्यार्थ्यांमध्ये सामाजिक आणि शैक्षणिक बांधिलकीची जाणीव निर्माण होते. माझी शाळा  सुंदर शाळा, माझा समाज  स्वच्छ समाज या ब्रीदवाक्याचे पालन करत संस्थेचा विकास व समाजसेवा या क्षेत्रात सतत पुढे जाण्याचा मानस आहे. हा सोहळा विद्यार्थ्यांसाठी तसेच स्थानिक नागरिकांसाठीही प्रेरणादायी ठरला आहे.

# मानवसेवा हाच खरा धर्म - अंकुश बोरवार

## बेनोडा ( शहीद ) येथे मुळव्याध औषधोपचार शिबिर




महासागर | प्रतिनिधी

**वरूड, ( दि. 15 )–** येथून जवळच असलेल्या बेनोडा (शहीद) येथे नुकतेच मुळव्याध औषधोपचार शिबिराचे यशस्वी आयोजन करण्यात आले. या शिबिराला सुमारे 200 हून अधिक स्त्री–पुरुष रुग्णांनी हजेरी लावून आपल्या व्याधीवर मोफत उपचार घेतले. या शिबिराचे प्रमुख आकर्षण होते डॉ. धनश्री जोशी, ज्यांनी रुग्णांना मुळव्याध या आजाराबद्दल सविस्तर माहिती दिली. त्यांनी सांगितले की, गुदद्वारातील आतल्या व बाहेरच्या सुजलेल्या रक्तवाहिन्यांमुळे होणाऱ्या वेदना आणि रक्तस्राव हाच मुळव्याध रोगाचा मूळ स्वरूप आहे. या आजाराचे प्रमाण आता तरुण पिढीतही झपाट्याने वाढत आहे. नियमित व्यायाम आणि संतुलित आहार यामुळे पचन सुधारते व हा आजार टाळता येतो, असा मार्गदर्शनपर सल्ला त्यांनी दिला. भारतात सध्या अंदाजे 4 कोटी लोक मुळव्याधाने त्रस्त असून, दरवर्षी 10 लाख नवे रुग्ण वाढत असल्याचे त्यांनी सांगितले. यावेळी शैलेंद्र जैन व किरजीव भुराणी यांचे सहकार्य लक्षणीय ठरले. आयोजक सामाजिक कार्यकर्ते अंकुश बोरवार यांनी सांगितले की, रुग्णसेवा म्हणजेच खरी मानवसेवा असून, हे कार्य सहकार्य व एकजुटीने यशस्वीपणे पार पडले आहे. रुग्णाला रक्ताची गरज भासल्यास तातडीने संपर्क साधावा असे आवाहन केले आहे.

# निर्मिती पब्लिक स्कूलचा पूर्णा माय स्वच्छता अभियान

## माझी शाळा, सुंदर शाळा अंतर्गत उपक्रम

महासागर | प्रतिनिधी

**चांदूर बाजार, ( दि. 15 ) :** समाजासाठी प्रेरणादायी उपक्रम म्हणून निर्मिती पब्लिक स्कूल तर्फे पूर्णा माय स्वच्छता अभियान मोठ्या उत्साहात राबविण्यात आले. गणपती विसर्जनानंतर पूर्णा नदीच्या काठावर मूर्ती अवशेष, फुलांचा कचरा आणि विविध प्रकारचा घाण मोकळ्या रस्त्यावर विखुरलेला दिसत होता. या समस्येकडे लक्ष देत शाळेने निसर्गाचे रक्षण, पर्यावरणाचे संवर्धन हा नवीन संकल्प घेऊन अभियान राबविले.




संस्थेचे अध्यक्ष भास्कर टोम्पे यांच्या प्रेरणेतून आणि मुख्याध्यापक तुषार खोंड यांच्या मार्गदर्शनाखाली शाळेतील सर्व शिक्षक, शिक्षिका व विद्यार्थी धडाडीने सहभागी झाले. नदीकाठी स्वच्छता मोहीमेत प्रत्यक्ष हात घालून कचरा गोळा करण्यात आला.

क्रीडा शिक्षक सुयोग गोरले, शिवानी तेलखडे, साक्षी सपकाळ, वर्षा अढाऊ, सुमित राऊतकर, नामदेव उईके, वैभव तायडे, अनुप ठाकरे आणि इतर शिक्षकांनी विद्यार्थ्यांना पर्यावरण संवर्धनाचे महत्त्व समजावून सांगितले. या मोहिमेद्वारे विद्यार्थ्यांमध्ये सामाजिक जबाबदारीची जाणीव निर्माण झाली. त्यांनी स्वच्छता ही फक्त सरकारी जबाबदारी नाही, प्रत्येकाची जबाबदारी आहे असा संदेश संपूर्ण तालुक्यात प्रसारित केला. निर्मिती पब्लिक स्कूलचे ब्रीदवाक्य माझी शाळा सुंदर शाळा, माझा समाजस्वच्छ समाज या संदेशाचे प्रभावीपणे पालन करण्यात आले.

# आणखीन किती जीव गेल्यावर खड्डे बुजवणार ?

## वरुड ते नागपूर महामार्गावर जीवघेणे खड्डे

महासागर | प्रतिनिधी

**वरुड, ( दि. 15 ) –** वरुड ते नागपूर या राष्ट्रीय महामार्गावरील सुरळी ते ढगा या दरम्यानच्या डांबरी पुलावर दोन प्रचंड खड्डे निर्माण झाले आहेत. या खड्ड्यांमुळे रात्रीच्या वेळी अनेक अपघात घडून वाहनांचे मोठे नुकसान तर होतेच, शिवाय जीवितहानीसुद्धा होत आहे. असाच प्रकार रविवारी रात्री दीड वाजताच्या दरम्यान बाल्या उर्फ धर्मेंद्र गोहाड यांच्या चार चाकी वाहतुकीच्या प्रवासादरम्यान घडला ते नागपूर वरून परिवारासह बेनोड्याला येत असताना अपघात घडून चार चाकी वाहनाचे मोठे नुकसान झाले सुदैवाने जीवितहानी झाली नाही अन्यथा संपूर्ण कुटुंब या अपघातात गमवावं लागलं असतं असा अंगावर काटा आणणारा क्षण बाल्या उर्फ धर्मेंद्र गोहाड यांनी आमच्या वृत्तपत्राच्या प्रतिनिधीशी बोलताना सांगितला त्यामुळे हा अपघात किती भयानक असावा हे सुद्धा समजून घेऊन तातडीने खड्डे बुजवण्याची कारवाही राष्ट्रीय महामार्गाच्या अधिकाऱ्यांनी करावी अशी मागणी होत आहे.



यानंतर चार दिवसांपूर्वी याच ठिकाणी झालेल्या एसटी बस व दुचाकीच्या अपघातात दुचाकीस्वार विठ्ठल चंपतराव चवडे वय 55 रा. वाठोडा (पुनर्वसण) यांचा मृत्यू झाला. या घटनेनंतर संतापलेल्या नागरिकांनी सरळ सवाल उपस्थित केला आहे की, या मृत्यूला जबाबदार कोण ? सार्वजनिक बांधकाम विभाग तसेच राष्ट्रीय महामार्ग विभागाचे अधिकारी अभियंते या गंभीर समस्येकडे पूर्णपणे दुर्लक्ष करत असल्याचा आरोप नागरिक करत आहेत. अधिक किती निरपराधांचा बळी घेतल्यावर हे खड्डे बुजवले जातील ? असा आक्रोश स्थानिकांमध्ये उमटत आहे. अपघातांची संख्या दिवसेंदिवस वाढत असून, वाहतूक करणाऱ्या वाहनचालकांमध्ये भीतीचे वातावरण आहे. स्थानिकांनी स्पष्ट इशारा दिला आहे की, त्वरीत दुरुस्तीचे काम हाती घेऊन खड्डे बुजवले नाहीत तर संबंधित अभियंते व अधिकाऱ्यांवर गुन्हे दाखल करावेत, अशी मागणी आता जोर धरू लागली आहे. महामार्गावरील प्रवाशांचा जीव रोज धोक्यात घालणाऱ्या या निष्काळजी कारभाराबद्दल प्रशासन किती जागे होणार, हा प्रश्न नागरिकांना छळू लागला आहे.


# ग्रामपंचायत कार्यालय दहिगांव खुर्द

## पंचायत समिती अंजनगांव सुर्जी जि.प. अमरावती

निविदा सुचना क्र. १ दिनांक १६/०९/२०२५ ग्राम पंचायत कार्यालय दहिगांव खुर्द ता. अंजनगांव सुर्जी जि.प. अमरावती यांच्या मार्फत खालील कामाकरीता बी–१ निविदा जि.प. बांधकाम विभाग यांच्या कडिल योग्य त्या वर्गातील नोंदणीकृत कंत्राटदाराकडून मागविण्यात येत आहे.

| अ. क्र. | कामाचे नाव | लेखाशिर्ष | अंदाजित रक्कम | बयाना रक्कम | निविदा फी | काम पूर्ण करण्याचा कालावधी | निविदा प्रसिद्धीचा वेळ | पंजीबद्ध कंत्राटदाराचे वर्गीकरण | कोऱ्या निविदा पुरविणे व भरलेल्या निविदा सादर करण्याचे दिनांक वेळ | प्राप्त निविदा उघडण्याचा दिनांक व वेळ |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १. | नाली बांधकाम करणे | अनुसूचित जाती व नवबौद्ध घटकांचा विकास | ३४०००० | ३४०० | ३०० | ३ महिने | १ ली | वर्ग ६ व त्यावरील | १६/०९/२०२५ ते २४/०९/२०२५ | २५/०९/२०२५ |
| २. | रस्ता बांधकाम | अनुसूचित जाती व नवबौद्ध घटकांचा विकास | ४००००० | ४००० | ३०० | ४ महिने | १ ली | वर्ग ६ व त्यावरील | १६/०९/२०२५ ते २४/०९/२०२५ | २५/०९/२०२५ |
| ३. | धर्माळा बांधकाम | १५ वित्त आयोग | ८८५०० | ८८५ | ३०० | १ महिने | १ ली | वर्ग ६ व त्यावरील | १६/०९/२०२५ ते २४/०९/२०२५ | २५/०९/२०२५ |
| ४. | स्मशानभूमितील रस्ता दुरुस्ती | सामान्य निधी | ३०००० | ३०० | ३०० | १५ दिवस | १ ली | वर्ग ६ व त्यावरील | १६/०९/२०२५ ते २४/०९/२०२५ | २५/०९/२०२५ |

**अटी व शर्ती**

१. निविदेच्या अटी व शर्ती ग्रामपंचायत दहिगांव खुर्द कार्यालयीन वेळेत पहावयास मिळेल.
२. १% बयाना रक्कम निविदा मंजूर झाल्यानंतर डिडी स्वरूपात सादर करावी लागेल.
३. ग्राम पंचायत दहिगांव खुर्द कडून पुरविलेली निविदा ग्राह्य धरण्यात येईल.
४. निविदाबाबत सर्व अधिकार ग्रामपंचायत दहिगांव खुर्द कडे राहील.

**सरपंच**
**ग्रामपंचायत दहिगांव खुर्द**

**ग्रामविकास अधिकारी**
**ग्रामपंचायत दहिगांव खुर्द**

